शैक्षणिक संदर्भ अंक १४२ (जून - जुलै २०२३)

# खीर

लेखक : कृष्णकुमार

अनुवाद : सौमित्र



# खीर

**लेखक : कृष्णकुमार** **अनुवाद : सौमित्र**

मी शाळेतून घरी आलो तेव्हा आई कुठेतरी जाण्याची तयारी करत होती. तीन वाजले असतील. मी विचारणारच होतो तेवढ्यात आईच म्हणाली, “ बाळा, मी एकांकडे जाऊन येते. एक दोन तास लागतील. तू घरातच थांब. आतून कडी लावून घे. खायला ठेवलंय ते खा.”

आई घाईघाईने तयारी करत होती आणि मी विचार करत होतो, ‘एवढ्या मोठ्या घरात मी एकटाच कसा राहू?’ एकदा असं वाटलं की आईला म्हणावं मला पण घेऊन चल. पण तिची गडबड बघून मी गप्प बसलो. ‘बघू तरी थोडावेळ एकटं राहून’ असंही वाटलं. तासाभरात ताई येईलंच आणि बाबा यायला दोन तास लागतील.

दोन तीन मिनिटात आई निघून गेली आणि ती जाताच मी दरवाजा बंद करून घेतला. आता घरात मी अगदी एकटाच होतो. मी विचार करू लागलो...सर्वात आधी काय केलं पाहिजे? डोक्यात तसं काहीच येत नव्हतं.

आई म्हणाली होती खाऊन घे. मी स्वयंपाकघरात गेलो. पोळ्यांचा डबा जागेवरच होता. उघडून बघितलं तर पोळ्यांचा छान वास आला. शेगडीवर भाजीची कढई झाकून ठेवली होती. झाकण काढून बघितलं, वा... भेंडीची भाजी... आई किती छान करते!



मी ताटली घेऊन भाजी वाढून घेणार तेवढ्यात मला पोळीच्या डब्याजवळ एक मोठी वाटी कापडाने झाकून ठेवलेली दिसली. 'आता यात काय आहे?' कापड काढून बघितलं तर आत साबुदाणे होते. आईला साबुदाण्याची खीर करायची होती तर.... खिरीची आठवण येताच भाजी पोळी खाण्यावरून मनच उडालं. मी विचार केला, 'आई यायच्या आधी आपणच खीर केली तर...'

मी लगेच कामाला लागलो. भूक तर आधीच पळून गेली होती आणि मी हे पण विसरून गेलो की मी घरी एकटाच आहे... घरी कोणी असतं तर मला कोणी खीर करू दिली असती का, काय माहिती? पण आता मला खीर करायचीच होती... खूप हिंमत आली होती. जाळीचं कपाट उघडलं तर दूध समोरच होतं. तिथलेच एक दोन डबे उघडून साखर शोधली. काडेपेटी जवळच होती. तयारी तर सगळी झाली.

आई सगळं किती व्यवस्थित ठेवते. आपण तिचं कधी कौतुक पण करत नाही. आज संध्याकाळीच तिला सांगू..की ती किती छान ठेवते घर... असा विचार करत करत मी

शेगडीच्या वाती वर घेतल्या आणि काडेपेटी ओढून स्टोव्ह सुरु केला. साबुदाण्याचा वाडगा शेगडीवर ठेवला आणि पातेल्यातलं अर्ध दूध वाडग्यात घातलं. तीन चमचे साखर घातली. आता दूध गरम होईपर्यंत मी कशाला तिथे थांबू ..म्हणून मी बाहेर आलो. कितीतरी कामं होती. शाळेतून आल्यावर कपडे बदलायचे होते, तोंड धुवायचं होतं, बूट जागेवर ठेवले नव्हते...

सगळयात आधी काय करू... बूट ठेवू की तोंड धुवू.. पण पुन्हा बुटाला हात लावला म्हणून हात धुवावे लागतील. लोक बुटांना इतकं घाण का मानतात? हात लावला की लगेच धुवायला सांगतात. बूटालाच का...मांजरीला पण... बाबा रोज सांगतात, ‘मांजरीच्या हाताने जेवायचं नाही. तिला हात लावलाय ना आता हात धुवून जेवायला ये’. पण मांजरीसारखी स्वच्छ आख्या जगात कोणी नाही...बाबा तरी कुठे स्वच्छ राहतात? त्यांच्या शर्टाची कॉलर किती मळलेली असते...पण मांजरीचा गळा किती साफ असतो.

मी दप्तरापासून सुरुवात केली. शाळेचे कपडे काढून घरातले घातले. मागच्या अंगणात गेलो तर दोन्ही बादल्या रिकाम्या ... मग तांब्याने पिंपातलं पाणी काढून तोंड धुतलं. सपासप तोंडावर पाणी मारताना किती मजा येते. तोंड पुसलं. ‘अरे.... बूट ठेवायचे राहूनच गेले...जाऊ दे आज कोण आहे आपल्याला ओरडायला...सावकाश करू सगळं...’

सगळं काम झालं आणि अचानक मला आठवलं, आपण खीर ठेवली होती स्टोव्हवर.... मी धावतच आत गेलो... साबुदाणा वाडग्याला खाली चिकटून काळा पडला होता...पण वरच्या थोड्या खिरीतून छान वास येत होता. मी वाडगा खाली घेतला आणि स्टोव्ह बंद केला. दुसऱ्या वाटीत खीर काढून घेतली. अर्धवट जळलेले साबुदाणे खरडून

काढले. दुसरी वाटी अर्धी भरली होती. बरं वाटलं... आणि आता भुकेची जाणीव झाली. पण या जळलेल्या वाडग्याचं काय करायचं? मी चिमट्याने वाडगा उचलला आणि सगळं अंगण पार करून पिंपापाशी ठेवला. 'अरे, याला घासायला माती पाहिजे... किती वेळ चाललाय...कोणी आलं तर पंचाईत.'



पळत पळत बाहेर गल्लीत गेलो. बोटांनी, हाताने खोदून खोदून माती आणली. मग वाडगा घासायला सुरुवात केली. काही काही साबुदाणे इतके चिकटून बसले होते... निघतच नव्हते पण मी थोडीच त्यांना सोडणार होतो. चमच्याने, नखांनी खरडून खरडून पार वाडग्याचा तळ गाठला. मग मातीने घासलं.. शेवटी सगळी जळकी खीर निघून गेली आणि स्वच्छ वाडगा माझ्या हातात होता.



मी आनंदाने स्वयंपाकघरात गेलो. पण आत्ता मी जे बघितलं त्यात काहीतरी गडबड होती. वाटीत खीर नव्हती आणि मांजर मिशा पुसत खिडकीत बसली होती.

आता मी काय करणार.... चुपचाप वाटी धुतली आणि वाळवून भांड्यांमध्ये ठेवून दिली. ताटलीत दोन पोळ्या घेतल्या. भेंडीची भाजी घेतली आणि थोड्या वेळापूर्वी जिथे मांजर बसली होती त्याच खिडकीत बसून पाय हलवत पोळीभाजी खाऊ लागलो.



जरावेळाने ताई आली. मग बाबाही आले आणि शेवटी आई आली. सगळे चहा प्यायला बसले तितक्यात आईचा आवाज आला. “ मी साबुदाणा काढून ठेवला होता. आता दिसत नाही. कुठे गेला?”

ही कथा राजकमल प्रकाशनच्या कृष्णकुमार यांच्या ‘ आज नहीं पढ़ूँगा’ या कथासंग्रहातून घेतली आहे.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक १४० मधून साभार.*

§§§

---

लेखक : **कृष्णकुमार**, प्रसिद्ध चिंतनशील शिक्षणतज्ञ आणि लेखक. विद्यापीठात अध्यापनशास्त्राचे प्राध्यापक, एन. सी. ई. आर. टी. चे संचालक. पाकिस्तान आणि भारतातील शिक्षण पद्धतीवर ‘मेरा देश, तुम्हारा देश’ आणि ‘शांतीका समर’ ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. अनेक पुस्तके आणि विविध विषयांवर लेख प्रसिद्ध.

चित्रे : **पूजा के. मेनन**, कम्युनिकेशन डिझाईनची विद्यार्थिनी.

अनुवाद : **सौमित्र**, सी. एम आर. सर्जीकल्स या रोबोटिक सर्जरी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीत कार्यरत. भाषांतराची आवड.

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***